बाबासाहेब आंबेडकर बहुजन समाजाला उद्देशून म्हणत असत, " तुम्ही या देशाची शासनकर्ती जमात बनलेली मला बघायचे आहे". बाबासाहेबांचे हे मुख्य स्वप्न होते. बाबासाहेबांच्या उत्तरीय कालखंडात त्यांचे दुसरे स्वप्न "बौद्धमय भारताचे" होते. मला संपूर्ण भारताला बौद्धमय बनवायचे आहे असे बाबासाहेब म्हणत असत. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यकाळात त्यांचे हे दोन्ही महत्वाकांक्षीय अंतस्थ हेतू साध्य होऊ शकले नाही. बाबासाहेबांचे हे दोन्ही हेतू कमी वेळात साध्य होणे ही अशक्यप्राय बाब नव्हती. हजारो वर्षापासून परंपरेने व श्रद्धेने चालत आलेल्या सामाजिक व सांस्कृतिक प्रक्रियेत बदल करणे व लोकांनी तिला लगेचच स्वीकारणे ही जशी कमी कालावधीत न होणारी प्रक्रिया होती तशीच सत्तेची सर्व सूत्रे ज्यांच्या हातात एकवटलेली होती ती शासक जमात आपल्याजवळ असलेली सत्ता दुस-यांना बहाल करेल हा समज असंभवनीय होता. उलट कोणत्याही सामाजिक व राजकीय बदलात आपल्या हातून सत्ता जावू नये यासाठी वेगवेगळया घटकात "फुट पाडा व राज्य करा" ह्या नीतीचा शासक समाज वापर तर करणारच होता. म्हणून बाबासाहेब आंबेडकरांचे वरील स्वप्न साकार करण्यासाठी कालावधी तर लागेलच परंतु त्याहीपेक्षा बाबासाहेबांना मानणारा समाज किती मजबूत आहे व या मजबूत समाजाचे नेतृत्व करणारा नेता किती उंचीचा आहे यावरच बाबासाहेबांच्या स्वप्नपूर्तीची भिस्त अवलंबून आहे.

बाबासाहेबांना पाहिलेली व त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन आंदोलनात उतरलेली पिढी आता वार्धक्यात आलेली असून त्यानंतर पुस्तकाद्वारे व वर्तमानकालीन आंदोलनात सहभागी होत बाबासाहेबांना समजलेल्या पिढीवर बाबासाहेबांच्या स्वप्नपूर्तीची दारोमदार अवलंबून आहे. आजच्या पिढीतील आंबेडकरी समाजातील तरुण हा जसा बाबासाहेबांना मानणारा आहे तसाच तो भरकटलेला आहे.या दिशाहीन तरुणांना योग्य नेतृत्व देवू शकणा-या राष्ट्रीय आंबेडकरी नेत्याची आज खरी गरज आहे. मग असे राष्ट्रीय नेतृत्व देणारा नेता मायावती शिवाय दुसरा कोण होऊ शकतो?.

काही आंबेडकरी नेते जसे की, रामविलास पासवान, उदित राज, रामदास आठवले व प्रकाश आंबेडकर इत्यादी नेत्यांचे आपापले पक्ष आहेत. या नेत्यामध्ये स्वतंत्र बाण्याच्या राजकीय नेतृत्वाचा अभाव असून आपले नेतृत्व टिकवून ठेवण्यासाठी आपापल्या क्षेत्रात निवडणुकांच्या आखाड्यात राजकीय सौदेबाजी करताना दिसतात. जनमानसांचे पाठबळ व राष्ट्रीय राजकारणात अजूनही ते आपला दबदबा निर्माण करु शकले नाही.

बाबासाहेबानंतर मा. कांशीरामजीं यांचा कालखंड हा आंबेडकरी तरुण व कर्मचारी वर्ग यांच्यात राजकीय व सामाजिक क्षेत्राबाबत स्वाभिमानी बाणा जागविण्याचा होता. जातीयवादी भारतात दलितांचे नेतृत्व असलेल्या पक्षाकडे ब्राम्हनासकट इतर मागासवर्गीयाना पक्षाचे मतदार (व्होटर) म्हणून आकृष्ट करने हा कांशिरामजीनी केलेला चमत्कार होता. आपल्या पश्चात मायावती हया पक्षाला भरारी देऊ शकतात हे लक्षात येताच बहुजन पक्षाचे अध्यक्षपद आपल्या हयातीमध्येच मायावतीला बहाल करण्यात आले. कांशीरामजीच्या या निर्णयाला अनेक राज्यातुन विरोध झाला. परंतु कांशीरामजीने विरोधाला न जुमानता आपला निर्णय कायम ठेवला. आज मायावतीची राजकारण व समाजकारनातील भरारी बघता कांशीरमजीचा तो निर्णय किती योग्य होता याची प्रचीती येते.

मायावती युगाची सुरुवात 2007 सालच्या विधानसभा निवडणुकानंतरच झाली. मायावतीने आपल्या कनखर पद्दतीने प्रशासनात बदल घड़ऊन व जातियावादाच्या चौकटी मोडीत काढत उत्तर प्रदेशात फुले-आंबेडकरवाद रुजविन्यास सुरुवात केली. आंबेडकरवाद रुजविन्यासोबतच सर्वसमाजाचा मुख्यमंत्री असी आपली प्रतिमाही निर्माण केली. मायावती हया अत्यंत मुत्सद्देगिरिने वागत असून सरकार स्थापन करण्यासाठी इतरांची मदत घ्यावी लागली तरी तिने कधीही आपल्या तत्वासी काडीमोड केल्याचे दिसत नाहीं. उलट कोनाचाही विरोध असला तरी आपल्या तत्वाना पुढे रेटण्याचेच कार्य केले आहे. मायावती हया भारतातील केवळ पहिल्याच दलित मुख्यमंत्री नाहीत तर उत्तर प्रदेशात सलग पाच वर्षे सत्तेत रहाण्याचा विक्रमही मायावतीच्या नावावर आहे. मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात मायावतीने अनेक निर्णय घेतले. 7 लाख भूमिहीनाना जमीनीचा कब्जा दिला. आबेडकर ग्राम विकास योजने अंतर्गत साड़े अकरा हजार गावाचा कायापलट केला. डॉ. आंबेडकर ग्राम सुधार योजने अंतर्गत अनेक खेड्यांचा विकास करण्यात आला. बुध्द -फुले-शाहू आंबेडकराच्या नावाने जिल्हे व विद्यपिठे बनविली.

मायावतीनी समस्त बहुजन समाजाला त्यांच्या महान नायकानी केलेल्या कार्यापासून सतत प्रेरणा मिळत रहावी म्हणून गौतम बुध्दनगर जिल्ह्यातील नोएडा येथे अनेक बहुजन नायकांच्या नावे प्रेरणा स्थळाची निर्मिती केली. लखनौ व उत्तर प्रदेशची नवीन शान म्हणून भव्य अशा आंबेडकर सामाजीक परिवर्तन स्थळाची निर्मिती करण्यात आली. डॉ. भीमराव आंबेडकर स्मारक, डॉ. भीमराव आंबेडकर सामाजीक परिवर्तन संग्रहालय, डॉ. भीमराव आंबेडकर सामाजीक परिवर्तन गॅलरी, एलिफंट गॅलरी, भीमराव आंबेडकर गोमती बुध्द विहार, समतामूलक चौक, मान्यवर कांशीरामजी स्थल, बौध्द विहार शांति उपवनची निर्मिती करण्यात आली. दलितांना याच प्रेरणा स्थळापासून लढाईची उर्मी मिळेल.
मायावती ह्या बाबासाहेबांच्या विचाराणेच वाटचाल करीत आहेत. विकासाच्या दृष्टीने लहान लहान राज्य असणे अत्यावश्यक आहे ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची संकल्पना व भूमिका होती. मायावतीने महाकाय उत्तर प्रदेशची विभागनी करून छोटी छोटी राज्ये निर्माण करून बाबासाहेबांच्या विचारांची एकप्रकारे अंमलबजावणी केलेली दिसते. संसदेमध्ये दलितांच्या प्रश्नासाठी त्या किती आक्रमक होत आहेत याची परिचीती सा-या देशाला बघावयास मिळाली. केंद्रातील सत्ताधारी पक्षाने सतत सीबीआयची टागती तलवार लटकावित ठेवली असतानाही त्या सत्ताधा-याना कधीही शरण गेल्या नाहीत. मायावतीच्या फुले-पेरियार-आबेडकरवादी विचारामुळे प्रस्थापितांच्या सामाजिक, धार्मिक व राजकीय सत्तास्थानाला हादरे बसत आहेत. मायावतीच्या विचाराचा पाया हा आंबेडकरवाद असल्यामुळे उत्तर प्रदेशात बौद्ध संस्कृतीला चालना मिळत आहे. देशातील सारी आंबेडकरी जनता मायावतीच्या नेतृत्वाखाली एकवटली तर मनुवादी प्रतिकांचा पराभव अटळ आहे.

आज फेसबुक, ट्विटर व ब्लाग यासारखे सोशल नेटवर्क बाघितले तर त्यात मायावती बाबत तिरस्कार युक्तच अधिक लिहलेले दीसते. हे केवळ जातिवादी मानसिकतेचे द्योतक आहे. मायावती ह्या भावी प्रधानमंत्री पदाच्या प्रमुख दावेदार असतील हे अनेकानी मान्य केले आहे. मायावतीच्या रूपाने देशात कणखर राजकीय व्यक्तीमत्वाचा उदय झाला आहे. मायावतीजीनी अधिक कूटनीतिने पक्षाच्या योजना राबविल्या तर हा पक्ष गरीब व मध्यमवर्गाचा पक्ष बनेल व देशावर बहुजन पक्षाची सत्ता प्रस्थापित होईल.

आज मायावतीची आक्रमक शैली व कनखरपना दलित तरुणांना आकर्षित करीत आहे. दलित नेता व समाज सत्ताधारी बनला तर काय काय करता येते? याचे रोल मॉडेल मायावतीने जनतेसमोर ठेवले आहे. बदलत्या परिस्थिती भूतकाळातील तत्वाना चीकटून राहने हे अपरिहार्य नसते. याच भूमिकेतुन मायावतीच्या सर्वजन सुखाय सर्वजन हिताय या ना-याकडे बाघितले पाहिजे.
मायावती ह्या देशातील महत्वाच्या नेत्यांच्या यादीत समाविष्ट होण्यासोबतच त्या जगातील काही सशक्त महिलांच्या यादीत आपले स्थान पटकावले आहे. हे समस्त दलितासाठी व विशेषत: दलित महिलासाठी अभिमानांची बाब आहे. मायावती ह्या राजकीयदृष्ट्या जेवढ्या सशक्त होतील तीतकाच जास्त फायदा दलिताना होईल. संसद व विधान सभेत अधिकाधिक फुले अंबेडकरवादी पोहोचले तर बाबासाहेब प्रणीत विचारांची क्रांति करता येईल.

कांग्रेस व समाजवादी पक्षाच्या कार्यकाळात भीतिमुळे दलित तक्रार दाखल करीत नसत व तक्रार दाखल केलीच तर त्याची नोंद घेतल्या जात नसे परंतु मायावतीच्या कार्यकाळात दलिताना

कसल्याच प्रकारची भीती वाटत नसल्यामुळे व त्यांनी दाखल केलेल्या तक्रारीची लगेच नोंद होत असल्यामुळे उत्तर प्रदेशात गुन्हयाची नोंद झालेली आहे. परंतु मायावतीच्या चांगल्या गोष्टी दाखविन्यास प्रसारमाध्यमे घाबरत असतात.

उत्तर प्रदेशातील स्वशासन काळात अनेक निर्णय अंमलात आणले गेले हे वरील विवेचनावरून अधिक स्पष्ट होते. जर मायावती ह्या केंद्रातील सत्तेत आल्या व पंतप्रधानपदी आरूढ झाल्यास बाबासाहेबांचे स्वप्न साकार करण्यास अधिक मदत होईल. देशाचा एक पंतप्रधान जाहीरपणे एक विषमतावादी धर्म सोडत जगातील एकमेव विज्ञानवादी बौध्द धर्म स्वीकारतील तो क्षण जगातील सा-या बौध्दासाठी ऐतिहासिक ठरेल. बहन मायावती त्या दिशेने आगेकूच करीत आहेत परंतु देशातील सा-या बहुजन समाजाच्या पाठिंब्याशिवाय कसे शक्य होईल.?.


बापू राऊत

Blog: www.bmraut@blogspot.com

e-mail: bapumraut@gmail.com

mobile no.9224343464